अस्सल सोलापुरी

सुराज्य
सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार, दि.११ फेब्रुवारी २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १३६ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

प्रणितीताई माझ्या मोठ्या भगिनी

Rohit Pawar
@RRPSpeaks

आमदार @ShindePraniti ताईच्या वक्तव्यावरून नाराज झालेले कार्यकर्ते आपला राग व्यक्त करतायेत,पण कुणीही नाराज होऊ नये. त्या माझ्या मोठ्या भगिनी असून त्यांना बोलण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्यामुळं आपापसात वाद न करता बेरोजगारी हा आजचा मुख्य प्रश्न सोडवण्यासाठी आपण आपली शक्ती खर्च करूया!

ACTION

प्रणितीताईंच्या प्रश्नाने काँग्रेस-राष्ट्रवादीवाले भिडले

कोण रोहित पवार?

वरिष्ठ अंधाऱ्या रात्री भेटले, कनिष्ठ दिवसाउजेडी पेटले

REACTION

✔ सुराज्य/सोलापूर

राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा म्हणजे शरद पवार. दुसऱ्या अर्थाने राष्ट्रवादीची पॉवरबँक म्हणजे बारामतीचे पवार कुटुंब. कर्जत-जामखेडचे आ. रोहित पवार म्हणजे याच पॉवरफुल्ल घराण्याचे सदस्य. त्यांनी सोलापूर लोकसभा मतदारसंघाची राष्ट्रवादीकडून मागणी होऊ शकते; असे विधान केल्याप्रकरणी सोलापूर शहर मध्यमधील काँग्रेसच्या आमदार प्रणितीताई शिंदे यांना पत्रकारांनी प्रश्न विचारला. तेव्हा कोण रोहित पवार? असा प्रतिप्रश्न उपस्थित करून त्यांनी वादाला तोंड फोडले आणि दोन्ही काँग्रेसवाले एकमेकांना भिडले. तत्पूर्वी म्हणजे आदल्याच दिवशी रात्री उशिरा राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे सुशीलकुमार शिंदे यांना त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेटले. त्यानंतर उगवलेल्या सकाळी दोन्ही काँग्रेसमधील कनिष्ठ वादावादीने पेटले असल्याचे चित्र शुक्रवारी सोलापुरात पाहण्यास मिळाले.

क्रिया-प्रतिक्रिया

प्रणितीताईंच्या विधानानंतर राष्ट्रवादीचे युवक अध्यक्ष जुबेर बागवान यांनी काँग्रेसभवन येथे आ.रोहित पवार आणि प्रणिती शिंदे यांचा एकत्र फोटो लावून घोषणाबाजी केली. त्याला प्रत्युत्तर युवक काँग्रेसचे माजी नगरसेवक विनोद भोसले, बाबा करगुळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयाजवळ आ. प्रणिती शिंदे यांचे भले मोठे बॅनर लावत आता कस वटतय गॉड गॉड वाटतय का? असा सवाल करत राष्ट्रवादीला डिवचले.

काय म्हणाले महेश कोठे?

सुशीलकुमार शिंदे अडचणीत येतील, अशी वक्तव्य शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे यांनी टाळावीत, बारामतीला चॅलेंज करणे बारामतीला नव्हे तर सुशीलकुमार यांनाच अवघड जाऊ शकते, असा इशारा माजी महापौर महेश कोठे यांनी शुक्रवारी सकाळी माध्यमांशी बोलताना दिला.

कोठे म्हणाले, शहर काँग्रेस अध्यक्षांनी मर्यादित अधिकार असताना आपल्या मर्यादेतच बोलावे. ते शहर अध्यक्ष आहेत, प्रदेशाध्यक्ष नाहीत याचे भान ठेवावे. लोकसभेच्या निवडणुकांचे जागावाटप किंवा उमेदवार ठरवण्याचा अधिकार त्यांना नाही. विनाकारण काहीतरी बोलायचे आणि आघाडीमध्ये वितुष्ट वाढवायचे काम चेतन नरोटे यांनी केले आहे. खरे तर हा विषय काँग्रेस पक्षानेच सुरू केला. आरिफ शेख यांनी राष्ट्रवादीचे नेते सुधीर खरटमल यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना तुम्ही लोकसभा लढवा, असे सांगितले. अर्थात आरिफ शेख यांचे हे वक्तव्य सहजपणे आणि चेष्टेत होते. त्याचे एवढे गांभीर्य घेण्यापेक्षा चेतन नरोटे यांनी आरिफ शेख यांचे हे वैयक्तिक वक्तव्य आहे, असे सांगून विषयावर पडदा टाकायला हवा होता. चेतन नरोटे यांनी विनाकारण राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना डिवचण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्याला महाविकास आघाडीच्या माध्यमातून महापालिकेसह अनेक निवडणुका एकत्रित लढवायच्या आहेत. अजूनही लोकसभेच्या सोलापूर जागेविषयीचा प्रदेश किंवा केंद्रीय पातळीवर कोणताच निर्णय झालेला नाही, मग ही घाई का?असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

दोन दिवसांपूर्वी आ. रोहित पवार हे सोलापूर दौऱ्यावर आले होते. त्यावेळी सोलापूर लोकसभा मतदारसंघ राष्ट्रवादीला सोडण्याची मागणी होऊ शकते, असे विधान केले होते. त्यावरून काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी थेट बारामती मतदारसंघ काँग्रेसला सोडण्याची उलट मागणी केली होती. त्यावरून सोलापुरातील दोन्ही काँग्रेसमध्ये वादावादी सुरू झालेली असतानाच शुक्रवारी या वादात काँग्रेसमधून शिवसेना मार्गे राष्ट्रवादीकडे वाटचाल करणारे माजी महापौर महेश कोठे यांनी उडी घेतली. त्यांनी काँग्रेस शहराध्यक्ष नरोटे यांची बारामती मतदारसंघाची मागणी शिंदे कुटुंबीयांना अडचणीची ठरणारी आहे, असे वक्तव्य केल्यानंतर काही मिनिटातच आ. प्रणितीताई शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना 'कोण रोहित पवार?' असा प्रश्न उपस्थित केला आणि वाद भडकला. त्यानंतर दोन्ही काँग्रेसचे पदाधिकारी तोंडसुख घेत एकमेकांना भिडले.

काय म्हणाल्या प्रणितीताई?

माजी महापौर कोठे यांचे विधान झाल्यानंतर अवघ्या काही मिनिटांतच प्रणितीताई माध्यमांसमोर बोलत्या झाल्या. आ. रोहित पवार यांनी सोलापूर लोकसभा मतदारसंघ राष्ट्रवादीला सोडण्याबाबत वक्तव्य केले आहे. त्यावर आपले म्हणणे काय? असा प्रश्न माध्यमांनी विचारताच ' कोण रोहित पवार?' असा तात्काळ उलट प्रश्न उपस्थित केला. ' त्यांची पहिली टर्म आहे. काहीजणांमध्ये पोरकटपणा असतो. काही दिवसांनी त्यांच्यामध्ये मॅच्युरिटी येईल', असा टोमणा मारून सुरू असलेल्या काँग्रेस-राष्ट्रवादी वादाला नव्याने फोडणी टाकली.

काय म्हणाले होते रोहित पवार?

दोन दिवसांपूर्वी आ. रोहित पवार सोलापूर दौऱ्यावर होते. त्यावेळी माध्यमांशी बोलताना ते म्हणाले होते की दोन्ही काँग्रेस आघाडीच्या जागा वाटपात सोलापूर लोकसभा मतदारसंघ काँग्रेसकडे आहे. याठिकाणी सलग दोनवेळा काँग्रेसचा पराभव झाला आहे. शिवाय सुशीलकुमार शिंदे यांनी पुढील निवडणूक लढवणार नाही असे जाहीर केले आहे. त्यामुळे या मतदारसंघासाठी राष्ट्रवादीकडून मागणी होऊ शकते. या विधानानंतर काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी थेट बारामती लोकसभा मतदारसंघच काँग्रेसला सोडावा, अशी उलट मागणी केली होती.

राष्ट्रवादी युवक काँग्रेसला प्रसिद्धीसाठी केलेली काँग्रेसभवनसमोरील स्टंटबाजी महागात पडेल. उद्या जरी महानगरपालिकेच्या निवडणुका लागल्या; तर जुबेर बागवान व प्रशांत बाबर यांचे डिपॉझिट जप्त होईल; असे हे कार्यकर्ते आहेत. त्यामुळे आम्ही मनावर घेणार नाही. अशा या आंदोलनामुळे काँग्रेस पक्षाचे नुकसान होणार नाही. राष्ट्रवादी काँग्रेसलाच याचा फटका बसेल.

- गणेश डोंगरे (शहरअध्यक्ष - सोलापूर युवक काँग्रेस)

आमदार झाल्यानंतर आ. शिंदे यांनी काँग्रेसबरोबरच महेश कोठे, सिद्धाराम म्हेत्रे, दिलीप माने, बाळासाहेब शेळके, स्व. आनंदराव देवकते यांची घराणी संपवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चा गेल्या सहा महिन्यांपासून सुरू आहेत. आता त्या दुजोरा मिळत आहे. त्यांना भाजपमध्ये जायचे असेल तर त्यांनी खुशाल जावे. परंतु त्याची बंदूक राष्ट्रवादी पक्षावर ठेवू नये.

- प्रशांत बाबर (प्रदेश उपाध्यक्ष - राष्ट्रवादी युवक काँग्रेस)

गेल्या ११ वर्षात १६ लाख भारतीयांनी नागरिकत्व सोडले

२०२२ मध्ये सर्वाधिक नागरिकांनी देश सोडला; केंद्र सरकारची माहिती

✔ सुराज्य/नवी दिल्ली

गेल्या दशकभरात भारताचे नागरिकत्व सोडून परदेशात स्थायिक होणाऱ्यांची संख्या सातत्याने वाढत आहे. परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या ११ वर्षांत सुमारे १६ लाख नागरिकांनी भारताचे नागरिकत्व सोडलं असून त्यांनी इतर देशांमध्ये स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. २०२२ मध्ये म्हणजे, गेल्या वर्षी २ लाख २६ हजार ६२० इतक्या नागरिकांनी भारतीय नागरिकत्वाचा त्याग केला. ही संख्या आतापर्यंतची सर्वाधिक मोठी संख्या आहे. या नागरिकांनी भारतीय नागरिकत्वाचा त्याग का केला याचं कारण मात्र परराष्ट्र मंत्र्यांनी सांगितलं नाही. गुरुवारी राज्यसभेमध्ये विचारलेल्या एका प्रश्नाला लेखी उत्तर देताना परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी ही माहिती दिली.

राज्यसभेत सरकारने दिलेल्या आकडेवारीनुसार, २०११ पासून १६ लाखांहून अधिक भारतीयांनी आपले भारतीय नागरिकत्व सोडलं आहे. परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी दिलेल्या लेखी उत्तरात म्हटलं आहे की, २०१५ मध्ये भारतीय नागरिकत्व सोडणाऱ्यांची संख्या १, ३१, ४८९ होती. तर २०१६ मध्ये १,४१, ६०३ लोकांनी आपले नागरिकत्व सोडले. २०१७ मध्ये ही संख्या १, ३३, ०४९ इतकी होती. सन २०१८ मध्ये ही संख्या १, ३४,५६१ होती, तर २०१९ मध्ये १, ४४, ०१७, २०२० मध्ये ८५, २५६ आणि २०२१ मध्ये १, ६३, ३७० भारतीयांनी त्यांचे नागरिकत्व सोडले होते. गेल्या वर्षी ही संख्या सर्वाधिक असून, २,२५,६२० भारतीयांनी आपलं नागरिकत्व सोडलं.

गेल्या वर्षी संसदेत विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी सांगितलं होतं की, २०१६ साली ११०६ परकीय लोकांना भारतीय नागरिकत्व देण्यात आलं होतं. तसेच २०१७ साली ६२८, २०१८ साली ६२८ , २०१९ साली ९८७ आणि २०२० साली ६३९ लोकांना भारतीय नागरिकत्व देण्यात आलं आहे. भारताचे नागरिकत्व सोडून अमेरिकेचे नागरिकत्व स्वीकारण्याकडे नागरिकांचा सर्वाधिक कल असल्याचं एका अहवालातून स्पष्ट होतंय. त्यानंतर भारतीयांची पसंती ऑस्ट्रेलियाला आहे. तिसऱ्या क्रमांकावर कॅनडा हा देश आहे. तर चौथ्या क्रमांकावर ब्रिटन या देशाला पसंती आहे. एका आकडेवारीनुसार, १.३५ कोटीहून अधिक भारतीय नागरिक सध्या परदेशात वास्तव्य करत आहेत.

वाळुज देगाव येथे वृद्ध महिलेस मारहाण करून दागिने लुटले

✔ सुराज्य/सोलापूर

शेतातील वस्तीवर झोपले असताना दोघा चोरट्याने लोखंडी मेक आणि काठीने मारहाण करून वृध्द महिलेच्या अंगावरील दागिने लुटून पोबारा केला. ही जबरी चोरीची घटना वाळूज देगाव (ता.मोहोळ) येथे शुक्रवारी पहाटेच्या सुमारास घडली.

अलकाबाई पुरुषोत्तम मोटे (वय ६५ रा. वाळूज देगाव) असे जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. त्यांना मोहोळ येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात संतोष (मुलगा) यांनी दाखल केले. अलकाबाई आणि त्यांचे पती पुरुषोत्तम मोटे हे दोघे गुरुवारी रात्री जेवण करून शेतातील वस्तीवर झोपले होते. पहाटे एक वाजेच्या सुमारास तोंडावर कापड बांधलेल्या दोघा चोरट्यांनी घरात प्रवेश करून त्यांना ठार मारण्याची धमकी देत पैसे आणि दागिन्याची मागणी केली. त्यानंतर अलकाबाई यांना मारहाण केली. आणि त्यांच्या अंगावरील १० ग्रॅम सोन्याचे दागिने लुटून पसार झाले.या मारहाणीत अलकाबाई यांच्या डोक्यात जखम झाली असून त्यांचे हात फॅक्चर झाले आहे.

आ.माने यांना सेक्सटॉर्शनमध्ये अडकवण्याचा प्रयत्न; राजस्थानमधून एकाला अटक

✔ **सोलापूर** : मोहोळ विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार यशवंत माने यांना सेक्सटॉर्शनच्या जाळ्यात अडकविण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. जानेवारी २०२३ मध्ये आमदार माने यांच्या मोबाईल क्रमांकावर एक अश्लील मेसेज आला. अश्लील व्हिडिओ कॉल करून त्यांना भूरळ पाडण्याचा प्रयत्न केला गेला. तसेच, व्हिडिओ कॉल रेकॉर्ड करून सोशल मीडियावर हा व्हिडिओ व्हायरल करू, अशी धमकी त्यांना देऊन एक लाख रुपयांची खंडणी मागितली.

माने हे पुण्यात वास्तव्यास असून त्यांनी त्यांच्यासोबत घडलेल्या प्रकाराची माहिती पुण्यातील सायबर पोलिसांना दिली होती. त्यानंतर पोलिसांनी मोबाईल क्रमांक तपासून तो राजस्थानमधील असल्याचे निदर्शनास आल्यानंतर पोलिसांनी त्या ठिकाणी पथक पाठवले. पुणे पोलिसांच्या सायबर पोलिसांनी राजस्थानमधील भरतपूर या जिल्ह्यांत ७ दिवसांसाठी तळ ठोकून एकाला अटक केली आहे. रिझवान खान (वय २४) असे आरोपीचे नाव असून तो राजस्थानमधील आहे. आरोपी खान याने आत्तापर्यंत ८० जणांना असे फोन केले आहेत. आरोपीला अटक करुन पुण्यात आणल्यानंतर आमदार माने आणि अतिरिक्त पोलीस आयुक्त रामनाथ पोकळे यांच्यासोबत पत्रकार परिषदेत माहिती दिली आहे. दरम्यान, मी कुठल्या ही व्यक्तींशी बोललो नाही. तसेच मला लागोपाठ ७०-८० मेसेज करण्यात आले होते. एक लाख रुपयांची खंडणी मागितली होती, त्यामुळे मी ही तक्रार सायबर पोलिस ठाण्यात दाखल केली होती, असे आ.माने यांनी म्हटले आहे.

सोलापूरच्या हरीभाई प्रशालेतील १९८४ बॅच हे विद्यार्थी यात अमोल धाबळे, राजू मेहता, रवी हलगीकर, सुनील केंदळे, पुंजाल, राजेश गोसकी आदींचा समावेश आहे सर्वजण पहिल्या दिवसाचा प्रवासाचा आनंद लुटत आहे यात अमोल धाबळे या नाट्यकलाकाराने पुणेरी पगडी धोतर आणि भगवा शर्ट घातला आहे अनेक प्रवासी दौंड रेल्वे स्टेशन आणि गाडीतही त्यांच्याबरोबर फोटो काढून प्रवासाचा आनंद लुटत आहेत.

लोकन्यायालयपूर्व मोहिमेत २१७१ खटले निकाली

✔ **सोलापूर** : जिल्ह्यात उद्या (शनिवारी) होणाऱ्या राष्ट्रीय लोकन्यायालयपूर्व झालेल्या विशेष मोहिमेत २६३२ खटले ठेवण्यात आली होती, त्यातील २१७१ खटले निकाली निघाली आहेत.जिल्हा व तालुक्यात प्रलंबित खटले निकाली काढण्याकरीता ६ ते १० फेब्रुवारी या कालावधीमध्ये या विशेष मोहिमेचे आयोजन केले होते.

ही मोहिम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्रमुख जिल्हा न्यायाधीश डॉ. शब्बीर अहेमद औटी यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच त्यांनी जिल्हयातील सर्व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांना जास्तीत जास्त खटले निकाली काढण्यासाठी आवाहन केले. या मोहिमेमध्ये बार्शीचे न्यायदंडाधिकारी जे. ऐ. झारी यांनी त्यांच्या न्यायालयात प्रलंबित असलेल्या १९८७, १९८९ मध्ये दाखल केलेले खटले निकाली काढले, अशा प्रकारे ३५ वर्ष जुना खटला डॉ. औटी यांच्या मार्गदर्शनाखाली न्यायदंडाधिकाऱ्यांनी निकाली काढला. याव्यतिरिक्त जिल्हयातील सर्व न्यायदंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयातील एकूण २६३२ प्रलंबित खटले ठेवले होते, त्यापैकी २१७१ खटले निकाली काढण्यात आल्याचे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव नरेंद्र जोशी यांनी सांगितले. सोलापूर मुख्यालयातील न्यायदंडाधिकारी नम्रता बिरादार यांनी सलगपणे तिन्ही लोकन्यायालयापूर्वीच्या विशेष मोहिमेत अंतर्गत १११९, १०३६ व १००३ खटले निकाली काढत एक हजारांहून अधिक खटले विशेष मोहिमे अंतर्गत निकाली काढण्याची हॅटट्रीक साधली आहे.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

आता सगळं माझ्यावर ढकलत आहेत !!!

कल्याण
129-22-679

मेन बाजार
470-19-478

शेतीच्या वाटणीसाठी जन्मदात्या पित्याचे हातोडीने तोडले पाय

२ मुले, सुना आणि पहिली पत्नी अशा ५ जणांविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा

माळशिरस तालुक्यातील चांदापुरी येथील घटना

पिलीव : माळाशिरस-शेत जमिनीची वाटणी करून देत नाही म्हणून जन्मदात्या पिताल्या खाली पाडून हातोडा, लोखंडी गज आणि काठीने बेदम मारहाण करीत पाय फ्रॅक्चर करून खुनाचा प्रयत्न केल्याची घटना चांदापुरी (ता.माळशिरस) येथील शेटेवस्तीत बुधवारी सकाळच्या सुमारास घडली.

या प्रकरणात माळशिरसच्या पोलिसांनी जखमीची पहिली पत्नी तिची दोन मुले आणि दोन सुना अशा ५ जणांविरुध्द खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. शशिकांत बाळकृष्ण सातपुते (वय ५६ रा.शेटेवस्ती चांदापुरी ता.माळशिरस) असे जखमी झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. त्यांना उपचारासाठी अकलूज येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून त्यांची पहिली पत्नी अलका सातपुते, तिची दोन मुले ज्ञानेश्वर सातपुते, संगम सातपुते,दोन सुना अनिता ज्ञानेश्वर सातपुते आणि अनुराधा संगम सातपुते (सर्व रा.चांदापूरी) अशा ५ जणाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. त्यापैकी दोघांना अटक करून पोलीस कोठडी घेण्यात आली. शशिकांत सातपुते यांना दोन बायका असून त्यांच्या शेतजमीन वाटपाचा दावा न्यायप्रविष्ठ आहे. असे असताना जमिनीचे वाटप करण्याच्या कारणावरून त्यांच्या दोन्ही मुलांनी त्यांना खाली आपटून अंगावर बसले आणि याला जिवंत ठेवायचे नाही असे म्हणत हातोड्याने पायावर मारून पाय फ्रॅक्चर केले. त्यावेळी त्यांच्या पत्नीने काठीने मारहाण केली. तर दोन्ही सुनानी लोखंडी गज आणि पाईपने मारहाण केली. दरम्यान त्यांची मुलगी धनश्री ही मध्ये पडली असता तिला देखील पाच जणांनी मारहाण केली. अशी नोंद पोलिसात झाली. सहाय्यक निरीक्षक शेळके पुढील तपास करीत आहे.